सादर,

**विषय - स्वच्छ भारत मिशन अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये संभाजीनगर जिल्हयात मैला गाळ व्यवस्थापन (FSM) प्रकल्पाचे परिक्षण विकास व अंमलबजावणी करणेसाठी जिल्हा स्तरावर व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्था त्यांचे इम्पॅनेलमेंट करणेस मान्यता मिळणे बाबत.**

संदर्भ - १. शासन निर्णय क्रमांक स्वभामि/२७२१/प्रक्र२७२/पापु१६, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक २/१२/२०२१.

२. शासन निर्णय क्रमांक स्वभामि/२७२१/प्रक्र२७२/पापु१६, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक २६/११/२०२१.

३. शासन शुध्दिपत्रक क्रमाक स्वभामि/२०२०/प्रक्र११६/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक १४/१/२०२१.

४. शासन शुध्दिपत्रक क्रमाक स्वभामि/२०२०/प्रक्र११६/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक १२/१/२०२१.

५. शासन निर्णय क्रमांक स्वभामि/२०२०/प्रक्र११६/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग दिनांक २८/१०/२०२०.

सविनय सादर, उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत जिल्हयामध्ये शासन निर्णयानुसार मैला गाळ व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. या कामाकरिता सन २०२२-२३ मध्ये संभाजीनगर जिल्हयात मैला गाळ व्यवस्थापन FSM प्रकल्पाचे परिक्षण विकास अंमलबजावणी करणेसाठी जिल्हास्तरावर व्यावसायिक संस्था यांचे इम्पॅनेलमेंट करणे आवश्यक आहे. मैला गाळ व्यवस्थापन करणेकरिता सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक व DPR बनविणे आवश्यक आहे. संदर्भ क्र १ च्या शासन निर्णयामध्ये मुददा क्रमांक ६.१ मध्ये याकामी खालीलप्रमाणे सुचना दिलेल्या आहेत. प्रकल्पाचे परिक्षण व विकास अंमलबजावणी करणेसाठी जिल्हास्तरावर निवड झालेल्या व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्थेचे सहाय घेता येईल. जिल्हा परिषदेने त्यांच्या गरजेनुसार Expression of Interest (EOI) पध्दतीने जिल्हयासाठी व्यावसायिक संस्था यांचे इम्पॅनेलमेंट करुन व्यावसायिक संस्था यांनी सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रक प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे, तांत्रिक सहाय प्रदान करणे, याकरिता ग्रामस्तरीय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाकरिता तसेच जिल्हा तालुकास्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, मैला गाळ व्यवस्थापन, गोबरधनकरिता प्रत्येकी अनुदेय असलेल्या निधीच्य ५ टक्के किंवा रु १ लक्ष यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रक्कमेच्या मर्यादेपर्यत किंवा सदरचे रु १ लक्ष पेक्षा जास्त नसावी. व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांना शुल्क म्हणुंन अनुदेय आहे, उपरोक्त ५ टक्के किंवा रक्कम १ लक्ष रुपये यापैकी जे कमी असेल त्या रक्कमेची तरतूद प्रकल्पाच्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत करावी. सदर रक्कम अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट नसल्यास रक्कम अनुदेय असणार नाही, अशा सुचना आहेत, दिनांक २६/११/२०२१ च्या शासन निर्णयानुसार EOI संस्थांना खालीलप्रमाणे शुल्क अदाई करण्यात येईल.

| अ.क्र | EOI संस्था कामाचे टप्पे | प्रत्यक्ष केलेल्या कामासाठी EOI संस्था शुल्क अदाई टक्केवारी |
|---|---|---|
| १ | सर्वेक्षण अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे | तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यावर एकूण अनुदेय |

| | | |
|---|---|---|
| | | व्यावसायिक EOI संस्था शुल्काच्या १५ टक्के रक्कम |
| २ | कामाच्या कंत्राटदाराकडून उपांगाच्या कामाचे पर्यवेक्षण करुन काम पूर्ण करुन घेणे | अनुज्ञेय व्यावसायिक EOI संस्था शुल्काच्या १५ टक्के रक्कम |
| ३ | कामाचे समाधानकारक देखभाल व दुरुस्ती | अनुज्ञेय व्यावसायिक EOI संस्था शुल्काच्या १५ टक्के रक्कम<br>एकुण ५ वर्षात समान हफ्त्यात विभागून |

करिता प्रमाणे मैला गाळ व्यवस्थापन FSM २०२२-२३ साठी खालील अटी-शर्तीच्या अधीन राहून स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात देवून EOI पध्दतीने जिल्हयासाठी व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था इम्पॅनेलमेंट करणे योग्य वाटते.

अटी शर्ती -

१. सदर निविदेच्या दर कार्यारंभ आदेशापासून १ वर्षापर्यंत वैध राहतील.
   याबाबत मधील कालावधीत शासनाकडून दरात कपात झाल्यास त्यानुसार अथवा शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार बदल होईल.
२. व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था / व्यक्ती यांनी विभाग, उपविभाग यांचे प्राधान्य क्रमानुसार प्रस्ताव सादर करावे.
३. जागेचे उपलब्धतता, परवाने याची खात्री करुन प्रस्ताव करावेत. प्रस्ताव तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी मिळेपर्यंत त्यामध्ये होणा-या बदलानुसार प्रस्तावातील बदल आहे त्या किमतीत करावा लागेल.
४. सविस्तर प्रकल्प अहवाल DPR च तपासणी करुन दिलेल्या नमुन्यानुसार व बरोबर असल्याची खात्री करुन वरिष्ठ कार्यालयाच्या परवानगीने व निर्देशानुसार इम्पॅनेलमेंट व्यावसायिक संस्था यांनी सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला सहाय प्रदान करणे याबाबी करिता जिल्हयास मैला गाळ व्यवस्थापन करिता प्रत्येकी अनुदेय असलेल्या निधीच्या ५ टक्के किंवा रुपये १ लक्ष पेक्षा जास्त नसावी. व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्था यांना शुल्क म्हणून शासन स्तरावरुन संबधित प्रस्तावासाठी निधी उपलब्ध झालेनंतरच खालीलप्रमाणे अदा करण्यात येईल.

| क्र | EOI संस्था कामाचे टप्पे | प्रत्यक्ष केलेल्या कामासाठी EOI संस्था शुल्क अदाई टक्केवारी |
|---|---|---|
| १ | सर्वेक्षण अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे | तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यावर एकूण अनुदेय व्यावसायिक EOI संस्था शुल्काच्या १५ टक्के रक्कम |
| २ | कामाच्या कंत्राटदाराकडून उपांगाच्या कामाचे पर्यवेक्षण करुन काम पूर्ण करुन घेणे | अनुज्ञेय व्यावसायिक EOI संस्था शुल्काच्या १५ टक्के रक्कम |
| ३ | कामाचे समाधानकारक देखभाल व दुरुस्ती | अनुज्ञेय व्यावसायिक EOI संस्था शुल्काच्या १५ टक्के रक्कम<br>एकुण ५ वर्षात समान हफ्त्यात विभागून |

५. काम करित असतांना केंद्र शासन व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार काम करणे बंधनकारक राहील.
६. आदेशाच्या तारखेपासून १५ दिवसात सविस्तर प्रकल्प अहवाल DPR तयार करुन संबधित उपअभियंता, ग्रापापु उपविभाग यांचेकडे सादर करावा लागेल.
७. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास विलंब झाल्या आपण दंडास पात्र राहाल. दंड किती आकारावयाचा याबाबत मा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेश अंतिम राहतील.
८. आर्थिक वर्ष संपल्यानंतर आवश्यक असल्यास कामांना मुदतवाढ देणे किंवा कामाचे नविन दरपत्रक DPR मागविणे ही बाब उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता यांच्या अधिकारात राहील.
९. वेळोवेळी मा मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणी व स्वच्छता व कार्यकारी अभियंता ग्रापापु, तसेच वरिष्ठ कार्यालयाने दिलेल्या लेखी व तोंडी सुचनेनूसार कार्यवाही करण्यात यावी.
१०. निवड केलेल्या संस्थेने संबधित ग्रामपंचायतीशी १०० रुपयाच्या स्टॅम्पवर सविस्तर प्रकल्प अहवाल कामाबाबत करार करावा.
११. निवडलेल्या संस्थाचे करार कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार मा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.
१२. सदरच्या इम्पॅनेलमेंट व्यावसायिक संस्था / स्वयंसेवी संस्था यांना मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्पाचे सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला सहाय प्रदान करणे याबाबीचा अनुभव असणे आवश्यक आहे.
१३. सदर व्यावसायिक संस्थेस संबधित क्षेत्रातील तांत्रिक अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच संस्थेकडे विषयांकित अर्हतापात्र तांत्रिक मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. याबाबत विहित कालमर्यादा असल्याने त्याप्रमणे अपेक्षित कामाचा DPR व त्याप्रमाणे अंदाजपत्रक बनविणे आवश्यक आहे. संस्थेच्या इतर शासकीय ठिकाणी सदर कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
१४. सदर संस्थेने प्रकल्प व्यवस्थित कार्यान्वित होणेसाठी नियमाप्रमाणे संनियत्रण करुन प्रकल्प सुस्थितीत चालु राहील, याची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

(राजेंद्र देसले)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.)